| MHKO070010372025 | <u>नियमीत दिवाणी दावा</u><br><u>क्र.११८/२०२५</u> | बथूवेल तिवडे वि.<br>सदानंद तिवडे |
|---|---|---|

## <u>नि.क्र.५ खालील आदेश</u>

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**२.** अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**३.** वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. माझे विचारार्थ खालील मुद्दे येतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | यातील वादींनी त्यांचे म्हणणे सकृत दर्शनी बरोबर असल्याचे सिध्द केले आहे काय? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने असल्याचे वादींनी सिद्ध केले आहे काय? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | वादींचे मागणप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे नुकसान होणार आहे काय? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | आदेश कोणता? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

### :: <u>कारणमिमांसा</u> ::

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>**

**४.** वरील तीनही मुद्दे हे एकमेकात गुंतलेले असल्याने त्यांचे एकत्रीतपणे विवेचन केले आहे. वादींनी प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे.

५. वादींनी दावा मिळकती या चार अशा दर्शविलेल्या आहेत. त्याचे गट नं.१४३३, १४३६, १४३७ व १४४० असे दर्शविलेले आहेत. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१४ ला दिलेले आहे. त्यांच्या म्हणण्यातील कलम नं.३ चे अवलोकन करता त्यामध्ये त्यांनी वाद मिळकत गट नं. १४३३, १४३७ व १४४० बाबत वादीकथीत प्रमाणे कथन हे बरोबर असल्याचे कथन केलेले आहे. तसेच त्याबाबत वादींचे मालकी हक्कात व कब्जे वहीवाटीस त्या मिळकती असल्याचे त्यांना मान्य व कबुल असल्याचे दिसून येते. त्यावरुन त्या मिळकतीबाबत वाद असल्याचे दिसून येत नाही.

६. वादींनी प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. परंतु वादींनी दाव्या सदरी विनंती केलेली आहे की, ब) यातील दावा मिळकतींचे वाटप होवून दावा मिळकत १ब मधील विहीर वादी यांचे हिस्सेस आल्याचे जाहीर होवून मिळावे. त्यावरुन दावा शिर्षक व दावा विनंती हे एकरुप असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनाप्रमाणे वाटप झाले आहे किंवा नाही यावर वादींनीच शंका उपस्थित केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर प्रथमदर्शनी शंका उपस्थित होणेस वाव असल्याचे दिसून येते.

७. वादींनी अर्ज कलम नं.४ मध्ये नमुद केले आहे की, सदर वादी व प्रतिवादी यांचे वाटपाप्रमाणे प्रतिवादी यांना एकूण ८६.५ आर इतके क्षेत्र वाटपास आले असून वादी यांना ८१.५ आर इतके क्षेत्र वाटपास आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात दावा मिळकतीची बेरीज केली असता ती .१९+.०५+ .४७ + .१३ = .८४ अशी येते. त्यामुळे ती वादींच्याच कथनानुसार ८१.५ आर अशी येत नाही. त्यामुळे वाटप व दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र यामध्ये एकसमानता दिसून येत नसून विरोधाभास दिसून येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर प्रथमदर्शनी शंका उपस्थित होणेस वाव असल्याचे दिसून येते.

८. वादींनी अर्ज कलम नं.४ मध्ये पुढे कथन केले आहे की, यातील दावा मिळकतीपैकी मिळकत क्र.१ब म्हणजेच गट नं.१४३६ ही मिळकत वादी यांचे हिश्येस वाटपाने आलेली असून त्याध्ये वादी यांनी जलसिंचनासाठी विहीर खोदलेली असून सदर

विहीरीतील पाण्याचा वादी हे सन १९६८ पासून उपभोग घेत आलेले आहेत. त्याकरीता प्रथमतः गट नं.१४३६ च्या सातबारा उता–याचे अवलोकन होणे हे गरजेचे आहे. त्यानुसार संपुर्ण क्षेत्राची नोंद ही वादींच्या नांवे असल्याचे दिसून येत नाही. तसेच वादींनी त्यांच्यासह इतर सामाईकातील क्षेत्र असलेल्या व्यक्तीस दाव्यात पक्षकार केल्याचेही दिसून येत नाही. त्यांची नांवे शुभांगी धोंडोपंत तिवडे, वर्षा संतोष वाढवे, सागर शमूवेल तिवडे व दिपाली शमूवेल तिवडे अशी आहेत. त्यावरुन असे प्रथमदर्शनी दिसून येते की, एकतर त्या इसमांच्या कथीत ताब्यास कोणीही हरकत व अडथळा केला नाही किंवा त्यांचा त्यामध्ये सामाईकात ताबा नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर प्रथमदर्शनी शंका उपस्थित होणेस वाव असल्याचे दिसून येते.

**९.** गट नं.१४३६ च्या सातबारा उता–याचे अवलोकन करता त्यामध्ये प्रतिवादींची देखील नांवे नमुद असल्याचे दिसून येत आहे. तसेच वादींचे असे ही कथन असल्याचे दिसून येत नाही की, त्यांनी त्या नोंदीविरुध्द कार्यवाही दाखल केलेली आहे. त्यासोबतच अत्यंत महत्वपुर्ण बाब अशी की, त्या मिळकतीच्या इतर अधिकार सदरी इतर वारस आक्काताई मनोहर बिरणगे, शालूबाई धोंडीराम माने यांची नांवे नमुद असल्याचे दिसून येत आहे. परंतु त्यांना या दावेकामी पक्षकार केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर प्रथमदर्शनी शंका उपस्थित होणेस वाव असल्याचे दिसून येते.

**१०.** वादींनी आपली भिस्त ही फेरफार नं.२८३० व १८२८ वर ठेवलेली आहे. सदर फेरफारच्या प्रती या वादींनीच दाखल केलेल्या आहेत. त्याचे अवलोकन करता असे स्पष्ट दिसून येत आहे की, गट नं.१४३६ मध्ये प्रतिवादींचा देखील हिस्सा आहे. फेरफार क्र.१८२८ मध्ये गट नं.१४३६ चा उल्लेख आहे. तसेच फेरफार क्र.२८३० मध्ये स.नं.२१७ हिस्सा नं.२ ते ५ व स.नं.२१८ हिस्सा नं.२/३ चा उल्लेख आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१९ सोबत स.नं.२१७–५अ चा एकत्रीकरणाचा उतारा दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन करता स.नं.२१७–५अ चा गट नं.१४३६ झाल्याची नोंद आहे. त्यामुळे ती बाब प्रतिवादींच्या कथनास प्रथमदर्शनी पुष्टी देत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर प्रथमदर्शनी शंका उपस्थित होणेस वाव असल्याचे दिसून येते.

**११.** वादींनी दाखल केलेल्या गट नकाशावरुन वाद मिळकती कोणाच्या मालकी व कब्जाच्या आहेत हे निष्कर्ष अंतीमतः नोंदवता येणार नाहीत. तसेच वादींनी आपली भिस्त ही काही फोटोग्राफ्सवर ठेवलेली आहे. परंतु त्यावरुन मालकी व कब्जा हा ठरवता येणार नाही. वादींनी आपली भिस्त ही नि.क्र.१६ सोबत दाखल मा.उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरक कंपनी शाखा कोथळी यांना दिलेल्या अर्जावर ठेवलेली आहे. त्याचे अवलोकन करता हे स्पष्ट दिसून येत आहे की, गट नं.१४३६ मध्ये असलेल्या कथीत विहीरीवर प्रतिवादींनी विज कनेक्शन घेतलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींकडे देखील विज कनेक्शन असल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ विज कनेक्शन व ते पैसे भरत असलेल्या त्या अनुषंगाने पावत्यांवर आधारुन मालकी व कब्जाचा निष्कर्ष हा काढता येणार नाही.

**१२.** प्रतिवादींनी नि.क्र.१९ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवलेली आहे. त्यातील अ.क्र.२ ला दाखल केलेल्या संमतीपत्राचा ऊहापोह होणे हे गरजेचे आहे. त्यातील संपुर्ण मजकूर वाचला असता गट नं.१४३६ मध्ये इतर सहहिस्सेदार असल्याचे व वादींना ते मान्य असल्याचे स्पष्टपणे नमुद आहे. त्यावर वादी क्र.१ व २ चा फोटो असून त्यांच्या सहया देखील आहेत. वादींनी याप्रकरणात दाखल केलेले वादी क्र.१ चे फोटो व त्यावरील वादी क्र.१ चा फोटो हा एकच असल्याचे व सहीत देखील साम्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादींनी असेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत की, प्रतिवादींनी ते कागदपत्र बोगस तयार केलेले आहेत व वादींनी त्यांचेवर योग्य त्या न्यायालयात त्याविरुध्द दाद मागीतलेली आहे. सदर संमतीपत्र तथा प्रतिज्ञापत्र हे वादींच्या कथनास छेद देत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसून येत आहे.

**१३.** प्रतिवादींनी नि.क्र.१९ सोबत अ.क्र.३ ला गावकामगार तलाठी कोथळी यांनी दिलेल्या दाखल्याची प्रत दाखल केलेली आहे. त्यातील अत्यंत महत्वपुर्ण बाब म्हणजे तो दाखला दावा दाखल झाल्यानंतर तयार झालेला नसून तो सन २०१६ मध्ये देण्यात आलेला आहे. त्याचे अवलोकन करता तो देखील वादींच्या कथनास छेद देत

असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादींनी स.नं.२१७, गट नं.१४३६ चे जवळपास वीस वर्षापुर्वीपासूनचे सातबारा उता–याच्या प्रती या दाखल केलेल्या आहेत. त्याचेही अवलोकन करता प्रतिवादी/त्यांच्या पुर्व हक्कदाराच्या नावाच्या नोंदी त्यामध्ये असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१९ सोबत गट नं.१४३६ चा १९७५–१९७६ पासूनचा एक सातबारा उतारा दाखल केलेला आहे. त्यावर असे नमुद आहे की, तारणगहाण देणार– रामचंद्र दादा तिवडे– श्रीपती गोवींद तिवडे– गणपती गोवींद तिवडे. जर त्यामध्ये प्रतिवादी अगर त्यांच्या पुर्वहक्कदाराचा हिस्सा अथवा हक्क नसेल तर वादींच्या वडीलांनी गणपती व श्रीपती सोबत सदर गट नं.१४३६ ची मिळकत तारण गहाण का ठेवली याबाबत वादींनी कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सातबा–यावरील जवळपास ३० वर्षाहून अधिकच्या नोंदी या सर्व चुकीच्या आहेत, फेरफार चुकीचे आहेत आणि फोटो व लाईट कनेक्शनवरुन मालकी व कब्जा संबंधीताचा आहे असे ठरवता येणार नाही. त्यामुळे वादींच्या कथनावर उपस्थित झालेल्या शंकेची तीव्रता ही वाढल्याचे दिसून येत आहे.

**१४.** प्रतिवादींनी गट नं.१४३३, १४३७ व १४४० बाबत वाद उपस्थित केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्या हद्दीपर्यंत वादींचा अर्ज नमुद कारणास्तव मंजूर करणेस हरकत असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वर नमुद कथन व कारण पाहता वादींचा अर्ज हा अंशतः मंजूर होणेस पात्र असल्याचे दिसून येते. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा अर्ज खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दावा मिळकत गट नं.१४३३, १४३७ व १४४० मधील वादींच्या शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत व अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादींच्या विरुध्द देणेत येतो.

३. वादींची उर्वरीत मागणी ही नामंजूर करणेत येते.

४. सदर अर्जाचा खर्च हा ज्याने त्याने सोसावा.

५. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.08.18 17:54:09 +0530

**(अ.त्रिं.मनगिरे)**

दिनांक १८/०८/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 18/08/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 18/08/2025. |
| Judgment/order uploaded on | 18/08/2025. |